फाईल क्र. ३७४(२)/२०१७/१४-ब दि. ३० एप्रिल, २०१९

## महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१७

**जाहिरात क्रमांक : १७/२०१७ व अधिसूचना क्रमांक-६७/२०१७**

# अंतिम निकालाची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे जलसंपदा विभागातील सहायक कार्यकारी अभियंता स्थापत्य गट-अ, सहायक अभियंता, स्थापत्य गट-अ व सहायक अभियंता, स्थापत्य गट - ब, श्रेणी-२ या संवर्गातील पदे तसेच सार्वजनिक बांधकाम विभागातील सहायक कार्यकारी अभियंता, स्थापत्य गट-अ, व सहायक अभियंता, स्थापत्य गट - ब, श्रेणी-२ या संवर्गातील पदे, अशा एकूण १९९ पदांकरीता दिनांक १७ डिसेंबर,२०१७ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०१७ चा अंतिम निकाल दिनांक ३० एप्रिल, २०१९ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे. सदर परीक्षेत **बुलढाणा** या जिल्हयातील **श्री. तळेले एकनाथ संदीप** (बैठक क्रमांक - NG००२१०४) हे राज्यातून व मागासवर्गीयातून प्रथम आले आहेत. तसेच महिला वर्गवारीतून **सांगली** या जिल्हयातील **निकम सलोनी संजय** (बैठक क्रमांक - MB००१३८०) या राज्यात प्रथम आल्या आहेत.

२. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व पदनिहाय प्रत्येक वर्गवारीकरिता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (Cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

३. महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (पूर्व) परीक्षा-२०१७ दिनांक ९ जुलै २०१७ रोजी मुंबईसह अन्य इतर तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेच्या पूर्व परीक्षेकरिता ३१५१८ उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. सदर परीक्षेमधून मुख्य परीक्षेकरिता ३,५९३ उमेदवार अर्हता प्राप्त ठरले होते. प्रस्तुत मुख्य परीक्षा दिनांक १७ डिसेंबर, २०१७ रोजी मुंबईसह अन्य इतर तीन जिल्हा केंद्रावर घेण्यात आली आहे. लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी ६४० उमेदवार अर्हताप्राप्त ठरले. मुलाखती दिनांक २५ फेब्रुवारी ते २८ मार्च, २०१९ या कालावधीत झाल्या.

४. दिव्यांग व्यक्तिंसाठी राखीव असलेल्या पदांसाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवाराने शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, अप्रकि-२०१२ / प्र..क्र. २१७ / आरोग्य -६, दि. ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नविन संगणक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेल्या नविन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.

५. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या आणि दिनांक ११ मार्च, २०१९ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार **विषयांकित गट- अ व ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक म्हणजेच दिनांक १० मे, २०१७ रोजी किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र आवश्यक असून याच दिनांकापूर्वी सदर क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी विभागीय क्रिडा उपसंचालकांकडे सादर केलेल्या अर्जांची पोच पावती सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्या संदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, मुलाखतीपूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी सादर करणे अनिवार्य राहील.**

६. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त / शिफारसपात्र न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या वेबसाईटवरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील सूचना क्रमांक **३.८** पहावी. )

**उपसचिव (परीक्षा-१)**

**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**